महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार, दि. ८ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक ११६ | किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१८६४ : मराठीतील ज्येष्ठ कादंबरीकार हरी नारायण आपटे यांचा जन्म झाला.

१९३० : मराठी कवी आरती प्रभू यांचा जन्म झाला.

१९४८ : सर्व संस्थाने भारतीय जिल्ह्यामध्ये याच दिवशी समाविष्ट करण्यात आली.

१९७५ : आंतरराष्ट्रीय महिलादिन.

सेन्सेक्स ७८,९१८.९० -१,०९७.०० (१.३७%)

डॉलर ₹ ९१.९०

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३९ | १७ |
| दिल्ली | ३५ | १९ |
| मुंबई | ३८ | २२ |
| नागपूर | ३८ | २० |
| पुणे | ४० | १५ |

**सुविचार**

मित्र आणि कुटुंब हे आपल्या आयुष्याचे खरे धन आहेत; त्यांचे कधीही विसरू नका.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-६:४३ संध्या-६:३४

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६३,१२५/- २,८५,०००/-

**केळी भाव**

नवती : ---- ते ----
पिल बाग : ---- ते ----
कांदे बाग : ----

# इराण आता पराभूत राष्ट्र

## डोनाल्ड ट्रम्प यांचं मोठं वक्तव्य; इराणच्या अध्यक्षांनी मागितली आखाती राष्ट्रांची माफी

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

**अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील युद्ध अद्यापही सुरू असून या युद्धात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला आहे. तसेच या युद्धात आतापर्यंत शेकडो जणांचा मृत्यू झाला आहे. इराण आता अमेरिका-इस्रायलला जोरदार प्रत्युत्तर देत असून इराणने यूएईच्या अनेक शहरात हवाई हल्ले केले आहेत. त्यामुळे हे युद्ध आणखी भडकण्याची शक्यता असून संपूर्ण आखाती राष्ट्रांमध्ये युद्धजन्य परिस्थिती आहे. मात्र, असं असतानाच आज इराणच्या अध्यक्षांनी आखाती राष्ट्रांची माफी मागितली.**



इराणचे अध्यक्ष डॉ. मसूद पेझेश्कियान यांनी इराणच्या तात्पुरत्या नेतृत्व परिषदेने शेजारील देशांवरील हल्ले आणि क्षेपणास्त्र प्रक्षेपण थांबविण्याचा निर्णय घेतल्याचं सांगितलं. तसेच जोपर्यंत इतर देशातून हल्ले होणार नाहीत तोपर्यंत इराणही हल्ले करणार नाही अशी भूमिका घेत शेजारी असलेल्या मुस्लीम राष्ट्रांची माफी मागितली. दरम्यान, इराणच्या अध्यक्षांनी आखाती राष्ट्रांची माफी मागितल्यावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रतिक्रिया देत मोठं भाष्य केलं. इराण आता पराभूत राष्ट्र आहे, असं म्हणत डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर टीका केली.

इराण आता मध्य पूर्वेचा दादा राहिलेला नाही तर मध्य पूर्वेतील पराभूत राष्ट्र बनलं आहे आणि तो शरण येईपर्यंत अनेक दशकं इराण असंच पराभूत राष्ट्र राहील किंवा कदाचित पूर्णपणे कोसळेल. आज इराणवर मोठा हल्ला होईल. इराणच्या वाईट वर्तनामुळे ज्या क्षेत्रांना आणि लोकसंख्येला आतापर्यंत लक्ष्य मानलं जात नव्हतं, त्यांनाही विनाश किंवा मृत्यूचा धोका निर्माण झाला आहे, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण असं युद्ध (पान २ वर)

### इराणने शरणागती पत्करली - ट्रम्प

इराणने मध्यपूर्वेतील शेजारी राष्ट्रांची माफी मागितली आहे आणि शरणागती पत्करली आहे. तसेच वचन दिलं आहे की इराण आता त्यांच्यावर गोळीबार करणार नाही. मात्र, इराणने हे आश्वासन फक्त आणि फक्त अमेरिका, इस्रायलच्या अथक हल्ल्यामुळेच दिलं. अन्यथा ते मध्यपूर्वेवर ताबा मिळवून राज्य करू इच्छित होते. मागच्या हजारो वर्षांत इराणला त्याच्या शेजारील मध्य पूर्वेकडील देशांकडून पराभव पत्करावा लागला. त्यामुळे मध्य पूर्वेकडील काही राष्ट्रांनी मला म्हटलं की, धन्यवाद अध्यक्ष. तेव्हा मी त्यांना म्हटलं की, तुमचं स्वागत, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.

# सरकारने व्यावसायिक एलपीजीचा पुरवठा थांबवला

● देशातील हॉटेल इंडस्ट्री ठप्प होण्याची भीती

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**अमेरिका, इस्रायल-इराण संघर्षाचे पडसाद आता भारतातही जाणवू लागले आहे. या युद्धाचा परिणाम थेट एलपीजी पुरवठ्यावर झाला आहे. अशात केंद्र सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडरचा पुरवठा तात्पुरता थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे देशभरातील हॉटेल आणि फूड इंडस्ट्रीसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे.**

या युद्धाचे पडसाद संपुर्ण जगावर पडायला सुरुवात झाली आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीत केलेल्या नाकेबंदीमुळे मध्यपूर्वेतून येणाऱ्या एलपीजी टँकरची वाहतूक विस्कळीत झाली आहे. भारताला याचा मोठा फटका बसत आहे. कारण भारतातील एलपीजीचा मोठा हिस्सा आयातीवर अवलंबून आहे. सध्या युद्धामुळे देशातील गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना घरगुती गॅसचा तुटवडा भासू नये, यासाठी केंद्र सरकारने कमर्शियल एलपीजीचा पुरवठा थांबवण्याचा निर्णय घेतला आहे.

व्यवसायिक एलपीजी पुरवठा बंद करण्याच्या निर्णयाचा सर्वाधिक परिणाम हॉटेल आणि रेस्टॉरंट उद्योगावर होत आहे. नागपूर रेसिडेंट हॉटेल असोसिएशनने या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली आहे. युद्धाच्या कठीण (पान २ वर)

## थोडक्यात

### अंजनेरी ते ब्रह्मगिरी रोपवेला चालना

**नाशिक ।** बहुप्रतीक्षीत अंजनेरी ते ब्रह्मगिरी रोपवेची सुविधा सिंहस्थात उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. देशातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योतिर्लिंग, संत निवृत्तिनाथांची समाधी आणि साधूंचे १३ आखाडे असे वैविध्य असलेला त्र्यंबकेश्वरचा परिसर नैसर्गिक सौंदर्याने नटलेला आहे. त्र्यंबकेश्वरमधील ब्रह्मगिरी पर्वतावरून गोदावरी नदीचा उगम होतो.

### टी-२० विश्वचषकाचा रंगणार अंतिम सामना

**मुंबई ।** अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर ८ मार्च रोजी टी-२० विश्वचषकाचा अंतिम सामना रंगणार आहे. या सामन्यात भारत आणि न्यूझीलंड आमनेसामने असणार आहे. २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात ऑस्ट्रेलियाकडून झालेल्या पराभवामुळे भारतीय संघाने कंबर कसली आहे. नकारात्मक जिंक्स टाळण्यासाठी संघाने निवास व्यवस्था आणि ड्रेसिंग रूममध्ये मोठे बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.

## बिहारच्या राजकारणात होणार बदल?

# देशपातळीवरील राजकारणात नितीश कुमार यांची एन्ट्री!

वृत्तसंस्था । बिहार

**राज्यात घडत असलेल्या राजकीय घडामोडींमुळे हे राज्य चर्चेच्या केंद्रास्थानी आहे. बिहाराचे तब्बल ११ वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या नितीश कुमार यांनी थेट राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आणि सर्वांनाच आश्चर्याचा मोठा धक्का दिला. नितीश कुमार आता देश पातळीवरील राजकारणात सक्रिय होणार आहेत. यामुळे बिहार राज्यातील सत्तासमीकरणे बदलतील, याविषयी अनेक चर्चा रंगल्या आहेत.**

बिहारचा मुख्यमंत्री भाजपचा असेल हे जवळजवळ निश्चित मानले जात आहे. तर जेडीयू पक्षाचे दोन उपमुख्यमंत्री असतील. त्यामुळे सत्तेच्या चाव्या भाजपकडे येतील. तर उपमुख्यमंत्री



पदी नितीश कुमार यांचे चिरंजीव निशांत कुमार विराजमान होतील, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. या राजकीय समीकरणाचा फायदा चिराग पासवान यांच्या पक्षाला होणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यांची बिहार विधानसभेतील सत्ता वाढेल आणि आणखी एक मंत्रीपद त्यांना मिळू शकते. यामुळे विरोधी बाकावर असलेल्या राजद पक्षाला अडचणींना तोंड द्यावे (पान २ वर)

# वंदे भारत ट्रेन डब्यांच्या संख्येत वाढ

● मुंबई-अहमदाबाद ट्रेनला आता २० डबे; प्रवास होणार सुखकर

वृत्तसंस्था । मुंबई

**रेल्वे मंत्रालयाकडून वंदे भारत एक्सप्रेसच्या डब्यांमध्ये मोठे बदल करण्यात आले आहेत. मुंबई सेंट्रल ते अहमदाबाद धावणाऱ्या या वंदे भारतच्या डब्यांची संख्या वाढवून ती २० करण्यात आली आहे. यामुळे मुंबई ते गुजरात प्रवास करणाऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. ही ट्रेन देशातील ४२वी वंदे भारत एक्सप्रेस असून पश्चिम रेल्वे चालवते.**



मुंबई सेंट्रल ते अहमदाबाद (२२९६९/२२९६१) या वंदे भारत एक्सप्रेसची सुरूवात १३ मार्च २०२४ रोजी झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १२ मार्च २०२४मध्ये हिरवा झेंडा दाखवला होता. त्यानंतर २ वर्षांपासून या वंदे भारत एक्सप्रेसला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन रेल्वे मंत्रालयाने या गाडीच्या डब्यांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या या ट्रेनला १६ डबे आहेत.

आता ४ नवे एसी डबे जोडले जाणार आहेत. अतिरिक्त डबे जोडताच या एक्सप्रेसची प्रवासी संख्या २७८ होणार आहे. रेल्वेने आपल्या अधिकृत घोषणेत याबद्दल माहिती दिली आहे. परंतु, त्यांनी यावेळी असंही सांगितलं की हे बद्दल तात्पुरते आहेत.

९ मार्च २०२६पासून ते ३१ मार्च २०२६पर्यंत या ट्रेनचे डबे वाढवण्यात येणार आहेत. या सेमी हाय-स्पीड ट्रेनची पीक सीझनदरम्यान मोठी मागणी असते. गर्दी कमी करून प्रवाशांना सुखद आणि सुलभ प्रवास करता यावा या करणाने तात्पुरती डब्यांची संख्या वाढवण्यात आली आहे.

### ५ तासांत होतो प्रवास

मुंबई सेंट्रल ते अहमदाबाद या वंदे भारत एक्सप्रेसचा मार्ग ४९१ किमी लांब आहे. केवळ ५ तास ४० मिनिटांत मुंबई ते अहमदाबाद पोहचवणाऱ्या या ट्रेनला नागरिकांसह उद्योजक आणि व्यापाऱ्यांमध्येही मोठी मागणी आहे. ताशी ९० किमी धावणाऱ्या या रेल्वेमुळे प्रवासाचा एक आरामदायी आणि जलद पर्याय उपलब्ध झाला आहे. मुंबई-अहमदाबाद वंदे भारत एक्सप्रेस बोरिवली, सुरत, वापी जंक्शन आणि वडोदरा जंक्शन या स्थानकांवर थांबते.

# माजी खासदार फोडल्याने शिंदेंचा ठाकरेंना जोरदार धक्का

वृत्तसंस्था । मुंबई

**जळगाव लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार आणि उबाठा गटाचे उत्तर महाराष्ट्रातील नेते उन्मेश पाटील यांनी आज शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी त्यांचे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे पक्षात स्वागत करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेतील अनेक नेत्यांनी पक्ष प्रवेश केला. त्यामुळे शिंदेंच्या सेनेचे बळ वाढले. अशातच पुन्हा एकदा एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतील एका मोठ्या नेत्याला गळाला लावले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा ठाकरेंना मोठा धक्का शिंदेंनी दिला आहे. या नेत्यासह अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या हाती धनुष्यबाण घेतले आहे. याबाबत स्वतः एकनाथ शिंदे यांनी एक्सवरून ट्वीट करत माहिती दिली आहे.

जळगाव लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार आणि उबाठा गटाचे उत्तर महाराष्ट्रातील नेते उन्मेश पाटील यांनी आज (पान २ वर)

## सिंहस्थात भाविकांसाठी थेट स्नानघाटापर्यंत 'रुट मॅप'

वृत्तसंस्था । नाशिक

**आगामी सिंहस्थात येणाऱ्या कोट्यवधी भाविकांच्या सुरक्षेसह नियंत्रणासाठी पोलिस यंत्रणेने त्रिस्तरीय गर्दी सुरक्षाव्यवस्था आणि वाहतूक आराखडा निश्चित केला आहे.**



वाहने जिल्ह्यात येणाऱ्या सर्व रस्त्यांवर जिल्ह्याबाहेर भाविकांची अडविण्यात येणार असून, बाह्य ते अंतर्गत वाहनतळांपर्यंत शटल बसची व्यवस्था राहणार आहे. यासह (पान २ वर)

# जिल्ह्यातील ८१ हजार शेतकऱ्यांना कर्जमाफिचा लाभ

प्रतिनिधी । जळगाव

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेली कर्जमाफी शेतकरी हिताची आहे. जिल्ह्यात ८१ हजार शेतकऱ्यांना कर्जमाफीचा तर १ लाख ५३ हजार ४०९ शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर योजनेचा लाभ मिळेल, असे मत जिल्हा बँकेचे अध्यक्ष संजय पवार यांनी व्यक्त केले आहे.**

संजय पवार म्हणाले की, राज्याचा सन २६-२७ चा अर्थसंकल्प अजित पवार यांनीच मांडला असता परंतु दुदैवाने त्यांचे अपघातात निधन झाले. त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी अगोदरच तरतूद करून ठेवली होती. त्यांनीच ही घोषणाही केली असती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज अर्थसंकल्प सादर केला त्यात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा केली आहे. खऱ्या अर्थाने हा शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय (पान २ वर)

### कर्जमाफी योजना शेतकऱ्यांच्या हिताची : अध्यक्ष संजय पवार

**➢ बँकेला ४१० कोटी रुपये रक्कम अपेक्षित**

**शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. ३० सप्टेबर २०२५ पर्यंत थकित कर्जदार व नियमित फेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाच कर्जमाफी व प्रोत्साहनपर योजनेचा लाभ मिळणार आहे.**

● जिल्हा बँकेच्या शेतकऱ्यांच्या बाबतीत संजय पवार यांनी सांगितले की, जिल्ह्यात ८१ हजार ३९४ शेतकऱ्यांना दोन लाखपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. या शेतकऱ्यांकडे २७३ कोटी २७लाख रूपये थकित आहेत. त्यावरील व्याज १३७ कोटी १ लाख रूपये असे एकूण ४१० कोटी रूपयाची रक्कम होत आहे. शासनाच्या कर्जमाफी धोरणानुसार मार्च अखेर जिल्हा बँकेला ४१० कोटी रूपये रक्कम अपेक्षित आहे. ज्या शेतकऱ्यांचे २ लाखांपेक्षा अधिक कर्ज झालेले असेल. त्यांना २ लाखांच्या पुढील रक्कम भरावी लागणार आहे.

# इराणमध्ये ९ हजार भारतीय अडकले

## विद्यार्थ्यांना सुरक्षित भारतात आणण्यासाठी केंद्र सरकारची हालचाल

वृत्तसंस्था । तेहरान

**मध्यपूर्वेत वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणमध्ये सुमारे ९ हजार भारतीय नागरिक अडकले असल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर भारतीय विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अमेरिका आणि इस्रायलने इराणवर सुरू केलेल्या हल्ल्यांमुळे परिस्थिती तणावपूर्ण झाली असून या विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे भारतात आणण्यासाठी केंद्र सरकार विविध पर्यायांचा विचार करत आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, इराणमध्ये अडकलेल्या भारतीयांपैकी बहुतेक विद्यार्थी जम्मू-काश्मीर येथील आहेत. याशिवाय उत्तर प्रदेश आणि इतर काही राज्यांतील विद्यार्थीही तेथे शिक्षणासाठी गेलेले आहेत. हे विद्यार्थी प्रामुख्याने तेहरान आणि कोम या शहरांमध्ये अडकले आहेत. परिस्थिती गंभीर होत असल्याने भारताचे परराष्ट्र मंत्रालय आणि इराणमधील भारतीय दूतावास सतत संपर्कात असून भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेवर लक्ष ठेवले जात आहे.

दरम्यान, अमेरिका आणि इस्रायलने २८ फेब्रुवारीपासून इराणवर हवाई हल्ले सुरू केल्यानंतर इराणने देशातील हवाई वाहतूक पूर्णपणे बंद केली आहे. त्यामुळे भारतीय नागरिकांना थेट विमानाने भारतात आणणे सध्या शक्य नाही. या पार्श्वभूमीवर भारत सरकारने पर्यायी मार्गांचा विचार सुरू केला आहे.

केंद्र सरकारमधील एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, इराणमध्ये अडकलेल्या भारतीयांना रस्त्याने शेजारील देशांमध्ये नेण्याची योजना आखली जात आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना प्रथम आर्मेनिया किंवा तुर्कमेनिस्तान या देशांमध्ये सुरक्षितपणे हलवले जाईल. त्यानंतर त्या देशांमधून विमानाद्वारे त्यांना भारतात आणले जाईल. परदेशी नागरिकांना बाहेर पडण्यासाठी तुर्कमेनिस्तानने इराण सीमेवरील काही अतिरिक्त तपासणी नाकेही खुले केले आहेत. याचदरम्यान, अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी येत्या काही (पान २ वर)

● तेहरानमधील भारतीय दूतावासानेही विद्यार्थ्यांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे. काही विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले असून काही विद्यार्थी कोम शहरात पोहोचले आहेत. मात्र तेथेही स्फोटांचे आवाज ऐकू येत असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थी घाबरले असून त्यांनी भारत सरकारकडे लवकरात लवकर सुरक्षितपणे मायदेशी परत आणण्याची मागणी केली आहे. दूतावासाने सर्व भारतीयांना घराबाहेर न पडण्याचे आणि अत्यंत सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

## संपादकीय

### युद्धाचा घाट विध्वंसाच्या वाटेवर

देशांतर्गत आव्हानांनी जर्जर झालेल्या इस्रायली व अमेरिकी राष्ट्रप्रमुखांस थारेपालटाची गरज होती. म्हणून इराण युद्धाचा घाट घातला गेला. प्रत्येक बेजबाबदार नेत्याच्या आयुष्यात एक क्षण असा येतो तेथून त्याची कारकीर्द झपाट्याने उतरणीस लागते. इराणवरील हल्ल्याचा निर्णय हा क्षण अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारकीर्दीचा असा मध्यबिंदू असेल. असे ठामपणे म्हणता येते याचे कारण स्वत:च्या नसलेल्या युद्धात ट्रम्प यांनी अमेरिकेस ओढले आणि इस्रायलचे पंतप्रधान नरसंहारकारी बेंजामिन नेतान्याहू यांचा नवस फेडण्याची जबाबदारी स्वत:च्या डोक्यावर घेतली. इस्रायल स्वत:चे युद्ध लढू शकत नाही हा आतापर्यंतचा इतिहास आहे. अमेरिकेने पाठकुळी घेतल्याखेरीज इस्रायल चार पावलेही चालू शकत नाही, हादेखील याच इतिहासाचा भाग. गेल्या वर्षी डिसेंबरपासून नेतान्याहू यांनी इराणवर हल्ला करण्यासाठी ट्रम्प यांच्यामागे भुणभुण लावलेली होती. त्याचवेळी ट्रम्प हे इराणशी वाटाघाटींतून मार्ग काढण्याच्या प्रयत्नात होते. आताही गेल्याच आठवड्यात अमेरिका आणि इराण यांच्यात कराराच्या चर्चेची फेरी झाली. ती यशस्वी होण्यात युद्धखोर नेतान्याहू यांचे अपयश दडले होते. कोणत्याही परिस्थितीत अमेरिका आणि इराण यांच्यात करार होऊ नये हा नेतान्याहू यांचा प्रयत्न होता. आपल्याकडे बोफोर्स, टू जी घोटाळा हे जितके सत्य तितकेच इस्रायलमध्ये इराणी अणुबॉम्ब हे राजकीय सत्य आहे. खरे तर इराण अणुबॉम्ब बनवत नाही, असे प्रमाणपत्र आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगापासून अनेकांनी दिलेले असतानाही या इराणी अणुबॉम्बच्या धोक्याचे तुणतुणे नेतान्याहू वाजवत असतात. कारण विख्यात ब्रिटिश इतिहासकार सॅम्युएल जॉन्सन म्हणून गेला त्याप्रमाणे कोणत्याही बदमाशाप्रमाणे देशभक्ती हा नेतान्याहू यांचाही शेवटचा आसरा आहे. त्याचा पाया अन्यांच्या प्राणावर बेतलेला असल्याने कोणाचे ना कोणाचे तरी प्राण घेत राहणे हे नेतान्याहू यांच्यासाठी गरजेचे आहे.

# विद्यार्थ्यांनो,जीवनात जगण्याच्या दिशा ठरवा

## भारतीय लष्कराचे माजी लेफ्टनंट जनरल जगदीश चौधरी यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव



**या प्रगतीच्या वाटा समृद्ध करण्यासाठी विद्यार्थी जीवनात आपल्या जगण्याच्या दिशा ठरविण्याच्या आवश्यकता लक्षात घेता आपण जे क्षेत्र निवडाल त्या क्षेत्रात कार्यरत असताना प्रामाणिकपणाने काम केल्यास ती प्रामाणिकता, ती सचोटी देशाची प्रगती होण्यास महत्त्वपूर्ण असते, असे विचार भारतीय लष्कराचे माजी लेफ्टनंट जनरल जगदीश चौधरी यांनी केले.**

सर्वोदय एज्युकेशन सोसायटीच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अनिल महाजन होते. या कार्यक्रमास माजी न्यायाधीश विश्वासराव चौधरी, उद्योजक निखिल चौधरी आदी उपस्थित होते. प्रमुख अतिथी जगदीश चौधरी पुढे बोलताना म्हणाले की, केवळ आर्मीत असलेल्यांनीच प्रामाणिकपणे काम करावे असं नाही तर प्रत्येक क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करणे हे आपली नैतिक जबाबदारी असून त्या जबाबदारीच्या विचारांनीच नव्या पिढीला नव्या विचाराला चालना मिळत असल्याचे देखील त्यांनी याप्रसंगी मांडले. चौधरी यांनी संस्थेच्या व शाळेच्या कार्याचे कौतुक केले.

निखिल चौधरी यांनी शाळेच्या सर्वांग सुंदर वातावरणातून विद्यार्थी गुणवंत होत जातात आणि हेच गुणवंत देश विकासाच्या वाहिन्या असतात. देशाला समृद्धता अशा विचारातूनच प्राप्त होत असते, असे मत त्यांनी मांडले. या कार्यक्रमास संस्थेचे सचिव विलास चौधरी, चेअरमन डी.यु.भोळे, संचालक सुनील चौधरी, पंडित चौधरी, उद्धवराव पाटील, आर.बी.महाजन, प्रमोद आटाळे, दिलीप अत्तरदे आदी या कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक डॉ. मिलिंद बागुल यांनी केले.

याप्रसंगी विद्यालयाचे माजी विद्यार्थी ज्यांनी विविध क्षेत्रांमध्ये उत्तम अशी कामगिरी केलेले राकेश कोल्हे (प्रकल्प व्यवस्थापक जैन उद्योग, जळगाव), तुषार चौधरी (उद्योजक, जळगाव ) तर विद्यार्थी साहित्यिक गौरव मोरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगिनी महाजन यांनी केले. प्रमुख पाहुण्याचा परिचय भावना चौधरी, तर बक्षिसांचे वाचन के. बी. तायडे, भारती पाटील यांनी केले. आभार एल.जे.भुगवड्या यांनी मानले. कार्यक्रमाप्रसंगी जी. के. भुगवड्या संपादित दृष्टिक्षेपात शाळा ह्या विशेषांकाचे प्रकाशन तसेच मीनाक्षी कोल्हे यांनी तयार केलेल्या लष्कराचे माजी लेफ्टनंट जनरल जगदीश चौधरी यांच्या कार्य वृत्तांत छायाचित्र प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी तृप्ती बिऱ्हाडे, प्रज्ञा कापडणे, गौरव मोरे, तुषार चौधरी, राकेश कोल्हे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास प्राथमिक मुख्याध्यापिका पौर्णिमा भोळे, पर्यवेक्षक एल.जे.पाटील, महेश भोळे, किरण बिऱ्हाडे, कैलास चौधरी, ज्येष्ठ सभासद आर.सी.महाजन, सतीश डोळसे, पितांबर नेहेते, चिंधू महाजन, निर्मला चौधरी, कल्पना चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.

# समाजकार्य महाविद्यालयात आज राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

**येथील धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय आणि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मासवे) यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ आणि ९ मार्च रोजी दोन दिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.**

सदर परिषदेचा विषय सामाजिक कायदे : शाश्वत आणि समावेशी विकास साध्य करण्यात कायद्याची भूमिका असा आहे. उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार शिरीष चौधरी राहणार असून, उद्घाटक म्हणून महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष माजी न्यायमूर्ती सुनिल शुक्रे, मुंबई यांची उपस्थिती लाभणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून मधुकर कुऱ्हाडे (प्राचार्य,डी टी एस एस कॉलेज ऑफ लॉ, मालाड, मुंबई), महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्सचे संस्थापक व कार्यकारी अध्यक्ष अंबादास मोहिते, संस्थेचे उपाध्यक्ष सुनील पाटील, संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. पी. आर. चौधरी, संचालक डॉ. विनय पाटील, संचालक चंदन अत्तरदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राकेश चौधरी उपस्थित राहणार आहे.

सदर राष्ट्रीय परिषदेचे बीज भाषण मासवेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.अंबादास मोहिते करणार आहेत. दुपारच्या सत्रात बाल हक्क, प्रतिबंधक कायदे आणि महिला सक्षमीकरण या विषयावर संतोष शिंदे (मुंबई) यांचे व्याख्यान होईल. तसेच, परिषदेच्या विविध विषयावर आधारित बालकल्याण, महिला विकास आणि इतर सामाजिक कायदे यांवर तज्ज्ञांची चर्चा होणार आहे. देशभरातून ८१ शोधनिबंधांचे सादरीकरण होईल. परिषदेच्या समारोप सत्राचे अध्यक्ष संस्थेचे सचिव डॉ.पी.आर.चौधरी राहतील.

प्रमुख अतिथी म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, माजी सरकारी वकील अ‍ॅड. केतन ढाके, मासवे अध्यक्ष डॉ. अंबादास मोहिते, मासवे सचिव डॉ. संजय फुलकर, प्राचार्य डॉ. राकेश चौधरी उपस्थित राहतील.दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेस उपस्थिती द्यावी, असे आवाहन राष्ट्रीय परिषदेचे संयोजक डॉ. उमेश वाणी, डॉ. प्रशांत भोसले, डॉ. यशवंत महाजन, डॉ. शाम सोनवणे यांनी केले आहे.

## पान १ वरून

पान १ वरून

### सरकारने व्यावसायिक......

परिस्थितीत आम्ही केंद्र सरकारसोबत आहोत, मात्र एलपीजीवरील निर्बंध सरसकट न लावता टप्प्याटप्प्याने लागू करावेत, अशी संघटनेची भूमिका आहे. नागपूर रेसिडेंट हॉटेल असोसिएशनचे कार्यकारिणी सदस्य सुदर्शन वझलवार यांनी सांगितले की, कमर्शियल गॅसचा पुरवठा पूर्णपणे बंद राहिला तर पुढील चार ते पाच दिवसांत देशातील हॉटेल इंडस्ट्री बंद करण्याची वेळ येऊ शकते. हजारो छोटे-मोठे हॉटेल व्यवसाय या गॅसवर अवलंबून असल्याने त्यांच्यासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहू शकते, अशीही त्यांनी भीती व्यक्त केली. भारताकडे ३० दिवसांचा एलपीजी साठा - तेल कंपन्यांनी डीलर्सना पाठवलेल्या संदेशात स्पष्ट म्हटले आहे की, युद्धजन्य परिस्थितीमुळे कमर्शियल वापराचा गॅस पुरवठा पुढील सूचनेपर्यंत थांबवण्यात येत आहे. कृपया सिलेंडर घेण्यासाठी गाड्या पाठवू नयेत. परिस्थिती सुधारल्यानंतर पुढील माहिती देण्यात येईल. सध्या भारताकडे सुमारे ३० दिवसांचा एलपीजी साठा उपलब्ध असल्याचे सांगितले जात आहे. मात्र इराण-इस्रायल संघर्ष दीर्घकाळ सुरू राहिल्यास देशातील गॅस पुरवठ्यावर अधिक ताण येण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यात घरगुती गॅस मिळण्यातही विलंब होऊ शकतो, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

### जिल्ह्यातील ८१ हजार......

आहे. शासनाने नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रूपये प्रोत्साहनपर लाभ देण्याचे जाहीर केले आहे. जिल्हा बँकेत १लाख ५३हजार ४०९ शेतकरी नियमित कर्ज घेवून त्याची फेड करणारे आहेत. त्यांना ५० हजार रूपयांचा प्रोत्साहन अनुदानाचा लाभ मिळणार आहे. अशी माहितीही अध्यक्ष संजय पवार यांनी दिली.

### देशपातळीवरील राजकारणात......

लागेल. राज्यसभा निवडणुकीनंतर नितीशकुमार आपली भूमिका आणि रणनीती बदलतील असे राजदच्या नेत्यांनी सूचित केले आहे. राजदने विशेषतः तेजस्वी यादव यांनी मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्याबद्दल अधिक आक्रमक भूमिका स्वीकारलेली नाही. याचे कारण म्हणजे नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखाली त्यांना तिसऱ्यांदा त्यांच्यासोबत सत्तेत येण्याची आशा होती. पण आता नितीश बिहारच्या राजकारणात भाग घेणार नाहीत. हा राजदसाठीही मोठा धक्का मानला जात आहे. जर भाजपचा मुख्यमंत्री झाला तर राजदला आपली रणनिती बदलावी लागणार आहे. राजदच्या अडचणी वाढतील. याविषयी बोलताना राजद प्रवक्ते शक्ती सिंह यांनी महत्वाचे विधान केले आहे. आम्ही आणि आमचे नेते लालू प्रसाद यादव नेहमीच भाजपच्या विचारसरणींविरुद्ध लढलो आहोत. आम्ही त्या मार्गावर चालत राहू. परंतु, नितीश कुमारांऐवजी भाजप आघाडीवर असल्याने आमची रणनीती बदलेल हे निश्चित आहे. अर्थात, भाजपविरुद्धची आमची रणनीती देखील पूर्णपणे नवीन असेल. राजद आणि भाजपमध्ये राजकीय संघर्ष वाढेल, असे राजकीय तज्ज्ञ सांगतात. राजदला निःसंशयपणे आपली रणनीती बदलण्याचे आव्हान पेलावे लागेल. बिहारचा मुख्यमंत्री भाजपचा झाल्यास कोण होईल याविषयी अनेक नावांची चर्चा असली तरी शर्यतीत सम्राट चौधरी यांचे नाव आघाडीवर आहे. असे असले तरी भाजप ईबीसी किंवा ओबीसी उमेदवार उभा करून सर्वांना आश्चर्यचकित करू शकते.

### माजी खासदार फोडल्याने......

शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी त्यांचे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे पक्षात स्वागत करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. असे एकनाथ शिंदे यांनी ट्वीटमध्ये म्हटले आहे. उन्मेष पाटील यांच्यासोबत आज पंचायत समितीचे माजी सभापती, भाजप युवा मोर्चाचे माजी अध्यक्ष दिनेश बोरसे, पंचायत समितीचे उपसभापती भाऊसाहेब पाटील, भाजपचे माजी सभापती लीलाबाई पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे रवी चौधरी, भाजपचे माजी नगरसेवक चंदू तायडे, माजी नगरसेवक चिरागउद्दीन शेख, माजी नगरसेवक गणेश महाले, दिपक देशमुख, सुबोध वाघमारे, गवळी समाजाचे प्रमुख विजू गवळी, ओबीसी समाजाचे संजय चौधरी, बाळासाहेब पाटील, अनिल चव्हाण, रोहीत खैरनार, मंगेश साबळे, सोमनाथ पाटील, चंद्रकांत पाटील, रमेश पाटील, योगेश मोरे, राजेंद्र सोनावणे, महादेव गायकवाड, विलास गवळी, सुनिता पवार, रत्ना पाटील यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी आज शिवसेनेचा भगवा झेडा हाती घेतला. यावेळी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, खासदार मिलिंद देवरा, पाणीसुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, आमदार किशोर आप्पा पाटील, सुनील चौधरी तसेच शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सिंहस्थात भाविकांसाठी......

अंतर्गत स्नानघाटांपर्यंत भाविकांसाठी मरुट मॅपफ तयार केला असून, भाविकांना एका बाजूने ६४० वाहनतळापासून मीटर ते ७.९ किलोमीटरचा पायी प्रवास करावा लागणार वेध सिंहस्थाचे आहे. गर्दी नियंत्रणासाठी एआय - कृत्रिम बुद्धिमत्तेसह (एआय) अद्ययावत तंत्रज्ञानानुसार आगामी सिंहस्थात पोलिसिंग आणि गर्दी नियंत्रणाची तयारी करणाऱ्या यंत्रणांनी आता वाहनतळांसह महोल्डिंग पॉइंटफच्या निश्चितीवर भर दिला आहे. शहर व जिल्ह्यातील वाहनतळांबाबत बैठकी सुरू असताना प्रयागराजमध्ये महाकुंभावेळी शेकडो किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्याने उद्भवलेल्या भीषण स्थितीतून धडा घेत आगामी सिंहस्थात नाशिक जिल्ह्याबाहेरपर्यंत तटबंदी करण्याचा यंत्रणांचा विचार आहे. त्यासाठी विविध ठिकाणी वाहने रोखण्याचे नियोजन केल्याचे पोलिसांच्या सिंहस्थ कक्षातील सूत्रांनी सांगितले.

### इराण आता पराभूत......

भडकलं असताना आता इराणच्या अध्यक्षांनी मोठं पाऊल उचललं आहे. इराणने शेजारी असलेल्या मुस्लीम राष्ट्रांची माफी मागत क्षेपणास्त्र हल्ले थांबवत असल्याची घोषणा केली. इराणचे अध्यक्ष डॉ. मसूद पेझेश्कियान यांनी टीव्हीवर केलेल्या भाषणात म्हटलं की, इराणच्या तात्पुरत्या नेतृत्व परिषदेने शेजारील देशांवरील हल्ले आणि क्षेपणास्त्र प्रक्षेपण थांबविण्याचा निर्णय घेतला. जोपर्यंत इतर देशातून हल्ले होणार नाहीत, तोपर्यंत इराणही हल्ले करणार नाही. अमेरिका-इस्रायलसमोर शरणागती पत्करणार नाही- पेझेश्कियान म्हणाले, मी शेजारच्या देशांची माफी मागतो. इतर देशांवर आक्रमण करण्याचा आमचा कोणताही हेतू नव्हता. तथापि अमेरिका आणि इस्रायलसमोर शरणागती पत्करणार नाही, असेही पेझेश्कियान यांनी स्पष्ट केले. इराणने बिनशर्त शरणागती पत्करावी, अशी इच्छा शत्रूंनी व्यक्त केली. त्यांची इच्छा त्यांच्याबरोबरच त्यांच्या थडग्यात पुरली जाईल, असेही पेझेश्कियान म्हणाले.

### इराणमध्ये ९ हजार......

दिवसांत इराणवरील हल्ले आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते. या पार्श्वभूमीवर भारत सरकार सतर्क झाले असून अडकलेल्या भारतीयांना लवकरात लवकर सुरक्षित बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, गेल्या वर्षीही इराण आणि इस्रायलमध्ये तणाव वाढल्यानंतर भारत सरकारने ङ्गऑपरेशन सिंधूफ ही मोहीम राबवून सुमारे ३५०० भारतीयांना सुरक्षित भारतात आणले होते. यामध्ये विद्यार्थी, कामगार, व्यावसायिक आणि यात्रेकरूंचा समावेश होता. सध्याच्या परिस्थितीतही अशाच प्रकारची मोहीम राबवली जाऊ शकते, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

# महिलांसाठी स्वच्छतागृहे, सॅनिटरी नॅपकीन सुविधा उपलब्ध करून द्यावी!

## • महापौरांकडे निधी फाऊंडेशनची मागणी : महिला स्नेही शहरासाठी सदैव तत्पर

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची अवस्था सध्या अत्यंत दयनीय असून महिलांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे शहरात ठिकठिकाणी विशेषतः बाजारपेठेत महिलांसाठी सुसज्ज व सुरक्षित ई-टॉयलेट्स किंवा फिरती स्वच्छतागृहे उभारण्यात यावीत, अशी मागणी निधी फाऊंडेशनतर्फे महापौर दीपमाला काळे यांच्याकडे करण्यात आली.**



निधी फाऊंडेशनच्या अध्यक्षा वैशाली सूर्यकांत विसपुते यांनी नवनियुक्त महापौर दीपमाला काळे यांची भेट घेऊन अभिनंदन केले आणि निवेदन दिले. याप्रसंगी हेतल पाटील, यश विसपुते आदी उपस्थित होते.

निधी फाऊंडेशनने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, फाऊंडेशनच्या माध्यमातून गेल्या दहा वर्षांपासून जळगाव जिल्ह्यात मासिक पाळी आरोग्य व्यवस्थापन आणि महिलांच्या मूलभूत सुविधांबाबत जनजागृती व विविध उपक्रम राबविले जात आहेत. फाऊंडेशनच्या पाठपुराव्यामुळे शहरातील काही शासकीय कार्यालये व शाळांमध्ये सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग व डिस्पोजल मशीन बसविण्यात आले आहेत. मात्र, शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची अवस्था सध्या अत्यंत दयनीय असून महिलांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे शहरात ठिकठिकाणी महिलांसाठी सुसज्ज व सुरक्षित ई-टॉयलेट्स किंवा फिरती स्वच्छतागृहे उभारण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच शहरातील हॉटेल्स आणि पेट्रोलपंपांवरील स्वच्छतागृहे महिलांना वापरण्यासाठी विनासंकोच उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिकेमार्फत कडक नियमावली लागू करावी. याशिवाय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार महानगरपालिका शाळांमध्ये मुलींना मोफत सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करून देण्याची कार्यवाही तातडीने सुरू करावी, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान राबविणार

प्रतिनिधी । जळगाव

**महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या १८ फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार राज्यभर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्र.१ राबविण्यात येणार आहे.**

या अभियानाची अंमलबजावणी मार्च ते मे २०२६ या कालावधीत करण्यात येणार असून जळगाव जिल्ह्यात विविध महसूल मंडळ स्तरावर व नगर परिषद, नगरपंचायत स्तरावर एकदिवसीय समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती महसूल प्रशासनाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. या अभियानाचा उद्देश सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्न व प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढणे हा आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील नव्या तरतुदींबाबत जनजागृती करणे, या शिबिरांमध्ये नागरिकांना ७/१२ व ८अ उतारे, विविध प्रमाणपत्रे, महसुली नोंदींमध्ये दुरुस्ती, प्रलंबित प्रकरणांचे निराकरण तसेच महसूल कायद्यांबाबत मार्गदर्शन अशा सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

# अमळनेर महावितरणची वीज चोरीवर धडक मोहीम

प्रतिनिधी । अमळनेर



येथील म.रा.वि.वि.कंपनी अमळनेर उपविभाग १ अंतर्गत अमळनेर शहर व परिसरामधील घरगुती, व्यवसायिक व औद्योगिक वीज ग्राहकांच्या मीटरची तसेच वायरिंगची तपासणी महावितरणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सुरु केलेली असून गेल्या महिन्याभरात सुमारे ७० वीज चोरी करणाऱ्या ग्राहकांवर दंडात्मक व कायदेशीर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

त्यामध्ये घरगुती ६५, व्यवसायिक ५ असे एकूण ७० वीजचोर ग्राहकांनी सुमारे ५७ हजार ७०० युनटची वीज चोरी केल्याचे निष्पन्न झालेले आहे. त्यात मुखत्वे गलवाडे रोडवरील व्यवसायिक ग्राहकांचा देखील समावेश आहे. तसेच महावितरणतर्फे यापुढेही वीज चोरी करणाऱ्या ग्राहकांवर कार्यवाही चालू राहणार आहे. तरी अधिकृतपणे वीज कनेक्शन घेऊनच वीज वापर करावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात येत आहे. सदर धडक मोहिमेकरिता कार्यकारी अभियंता धरणगाव विभाग निलेश सोनगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली अमळनेर उपविभाग-१ चे अतिरिक्त कार्यकारी अभियंता टी. एच. नेमाडे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक तयार करून वीजचोरी शोध मोहीम राबविण्यात आली. ही कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

# कुणबी पाटील समाजाच्यावतीने जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज बीजनिमित्त पालखी मिरवणूक

प्रतिनिधी । अमळनेर

**सालाबादाप्रमाणे यावर्षी देखील कुणबी पाटील समाजाच्यावतीने जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज बीजनिमित्त पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. दगडी दरवाजाजवळ राजे संभाजी व शिवशक्ती मित्र परिवाराकडून उत्साहात स्वागत करण्यात आले. यावर्षी पालखी मिरवणुकीचे स्वागत फटाके व पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले.**



लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ.परीक्षित बाविस्कर, शिवसेना गटनेते पंकज चौधरी, अपक्ष गटनेते महेशबापू देशमुख, उपाध्यक्ष प्रशांत निकम, नगरसेवक कैलास पाटील, नगरसेवक तुळशीराम हटकर, नगरसेवक भरत परदेशी, नगरसेवक बाळू पाटील, नगरसेवक नविद शेख, नगरसेवक प्रताप साळी, तेली पंच मंडळाचे पराग चौधरी, बापू चौधरी, कुणबी पाटील समाज पंच ब्रिजलाल पाटील, किरण पाटील, संतोष पाटील, सुनिल अहिरराव, स्वामी चौधरी, कृणाल पाटील, आकाश अहिरराव, निलेश अहिरराव, भूषण अहिरराव, रोहित अहिरराव, हितेश देसले, समर्थ येवले, राहुल मराठे, प्रशांत पाटील यांनी राजे संभाजी चौक येथे भेट देत संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचा पालखीचे दर्शन घेत जगदगुरु तुकाराम महाराजांच्या प्रतिमेला अभिवादन केले व कुणबी पाटील समाज बांधवांना व नागरिकांना शुभेच्छा दिल्यात. याप्रसंगी राजे संभाजी व शिवशक्ती चौक मित्र परिवाराचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# सोने, चांदीची घसरण थांबली!

**प्रतिनिधी । जळगाव**

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत गेल्या सहा दिवसांपासून सोने, चांदीच्या दरात घसरणीला सुरुवात झाली होती. मात्र, शनिवारी सकाळी या घसरणीला ब्रेक लागला. दोन्ही धातुंच्या दरात मोठी वाढ झाल्याने लग्नसराईसाठी दागिन्यांची खरेदी करण्याकरिता आलेल्या ग्राहकांनी सावध भूमिका घेतल्याचे चित्र दिसून आले.

गेल्या काही दिवसांपासून सातत्याने घसरण अनुभवणाऱ्या सोने आणि चांदीच्या किमतींनी शनिवारी पुन्हा वेग घेतल्याचे दिसून आले. आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या अस्थिर परिस्थितीचा परिणाम मौल्यवान धातूंच्या बाजारपेठेवर स्पष्टपणे जाणवत असताना, विशेषतः पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे गुंतवणूकदार पुन्हा सुरक्षित गुंतवणुकीच्या पर्यायांकडे वळताना दिसत आहेत. त्यामुळे सोन्यासह चांदीच्या किमतींनाही काही प्रमाणात आधार मिळाल्याचे सोने-चांदी बाजारातील तज्ज्ञांचे मत आहे. मागील काही दिवसांपासून आंतरराष्ट्रीय बाजारात दोन्ही मौल्यवान धातुंच्या किमतीत बरीच घसरण झाली. त्याचा परिणाम देशांतर्गत बाजारावरही दिसून आला. जळगावसह राज्यातील अनेक शहरांमध्ये सोने-चांदीच्या दरात सातत्याने घट नोंदवली जात होती. त्यामुळे ग्राहकांमध्ये खरेदीची उत्सुकता वाढली होती. मात्र, शनिवारी अचानक सोने-चांदीच्या दराने पुन्हा वाढीचा कल दर्शवला.

जळगाव ही संपूर्ण देशात सोन्याच्या व्यापारासाठी ओळखली जाणारी मोठी बाजारपेठ आहे. येथे बाराही महिने मोठ्या प्रमाणावर सोन्या-चांदीची खरेदी-विक्री केली जाते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय बाजारातील बदलांचा थेट परिणाम या बाजारावरही दिसून येतो. व्यापाऱ्यांच्या मते, ग्राहकांकडून सध्या मर्यादित प्रमाणात खरेदी होत असली, तरी दरातील चढ-उतारामुळे बाजारात काही प्रमाणात उत्सुकता कायम आहे. आगामी काळात सोन्याच्या किमतींची दिशा प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय घडामोडींवर अवलंबून असेल. विशेषतः मध्यपूर्वेतील तणाव, अमेरिकन डॉलरची हालचाल, जागतिक महागाईचे प्रमाण तसेच प्रमुख देशांच्या केंद्रीय बँकांचे धोरण यांचा सोन्याच्या दरावर मोठा परिणाम होऊ शकतो. जर आंतरराष्ट्रीय स्तरावर अस्थिरता कायम राहिली, तर सोन्याच्या किमतींमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही,असा अंदाज वर्तविला आहे.

### ➢ सोने २१६३ रुपयांची वाढ

**जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत गुरुवारी १७५१ रुपयांची घट झाल्याने २४ कॅरेट सोन्याचे दर जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ६६ हजार ३६ रुपयांपर्यंत खाली आले होते. तर शुक्रवारी पुन्हा २०६० रुपयांची घट झाल्याने सोन्याचे दर जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ६३ हजार ९७६ रुपयांपर्यंत खाली आले होते. मात्र, शनिवारी आठवड्याच्या शेवटच्या दिवशी सकाळी २१६३ रुपयांची वाढ नोंदवली गेली. त्यामुळे दर जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ६६ हजार १३९ रुपयांपर्यंत पोहोचले.**

### ➢ चांदीचे दर किती वाढले?

जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत गुरुवारी १० हजार ३०० रुपयांची घट झाल्याने चांदीचे दर जीएसटीसह प्रति किलो दोन लाख ७५ हजार रुपयांपर्यंत घसरले होते. तर शुक्रवारी पुन्हा १०३० रुपयांची घट नोंदवली गेल्याने चांदीचे दर जीएसटीसह प्रति किलो दोन लाख ७३ हजार ९८० रुपयांपर्यंत खाली आले होते. मात्र, शनिवारी आठवड्याच्या शेवटच्या दिवशी सकाळी तब्बल ४१२० रुपयांची वाढ नोंदवली गेली. त्यामुळे चांदीचे दर जीएसटीसह प्रति किलो दोन लाख ७८ हजार १०० रुपयांपर्यंत पोहोचले.

# मालमत्ता करासंदर्भात आलेल्या तक्रारींचा दोन दिवसात निपटरा करा

## ● कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाईचा इशारा

**प्रतिनिधी । जळगाव**



**जळगाव महापालिकेच्या मालमत्ता कर वसुली विभागात नागरिकांच्या अर्जांकडे दुर्लक्ष करणाऱ्या आणि कामात टाळाटाळ करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध महापौर दीपमाला काळे यांनी कठोर पवित्रा घेतला आहे. त्यांनी प्रशासनाला दिलेल्या आदेशानुसार, उपायुक्त (महसूल) धनश्री शिंदे यांनी आज एका पत्राद्वारे सर्व वसुली लिपिक आणि कर्मचाऱ्यांना मालमत्ता कराविषयी कडक सूचना दिल्या आहेत.**



मालमत्ता करातील दुरुस्तीसाठी आलेल्या अर्जांवर कार्यवाही होत नसल्याच्या आणि संबंधित मिळकतधारकांना कर्मचाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याच्या तक्रारी खुद्द महापौरांनी पत्राद्वारे प्रशासनाकडे केल्या होत्या. तसेच शास्ती माफी योजनेत लिपिक रस घेत नसल्याचेही निदर्शनास आले होते. या गंभीर बाबीची दखल घेत प्रशासनाने आता दोन दिवसांत प्रलंबित अर्जांचा निपटारा करण्याचे आदेश दिले आहेत. प्रत्येक कार्यासनवर प्राप्त झालेल्या अर्जांचा निकाल पुढील २ दिवसांत लावून त्याचा कार्यपूर्ती अहवाल कर अधीक्षक आणि प्रभाग अधिकाऱ्यांमार्फत सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. जे लिपिक अहवाल देण्यास कसूर करतील, त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदींनुसार शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केली जाणार आहे.

**भरणा केंद्र सुरु ठेवण्याचे आदेश**

सुटीच्या दिवशी दुपारी १ वाजेपर्यंत भरणा काउंटर सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कर न भरणाऱ्या मिळकतींचे नळ कनेक्शन तोडणे, जप्ती आणि अटकावणी यांसारखी कठोर कारवाई करण्याचे निर्देशही मनपा आयुक्तांनी दिले आहेत. महानगरपालिकेच्या आर्थिक हितासाठी याबाबी अत्यंत महत्त्वाच्या असून, यात कोणतीही हलगर्जी खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा मनपा प्रशासनाने दिला आहे.

### ➢ सुटीच्या दिवशीही वसुली सुरू राहणार

महानगरपालिकेने ५ मार्च ते १९ मार्च २०२६ या कालावधीत शास्ती माफी अभय योजना सुरू केली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त थकबाकीदारांनी लाभ घ्यावा, यासाठी वसुली पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे ३१ मार्च २०२६ पर्यंत सर्व शनिवार, रविवार आणि शासकीय सुटीच्या दिवशीही वसुलीची कार्यवाही सुरू राहील.

# कमळगाव अहिल्याबाई होळकर माध्यमिक विद्यालयात विद्यार्थीनीकडून वाढदिवसाला पुस्तके भेट

**प्रतिनिधी । चोपडा**

**तालुक्यातील अहिल्याबाई होळकर माध्यमिक विद्यालय कमळगाव शाळेकडून विद्यार्थ्यांनी आवाहनाला प्रतिसाद देत इयत्ता ७वी.ची विद्यार्थिनी लावण्या किशोर धनगर हिने तिच्या वाढदिवसानिमित्त शाळेला पुस्तक भेट दिले. त्याबद्दल तिचे विद्यालयातर्फे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.व शाबासकी देण्यात आली.**



विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि शाळेचे ग्रंथालय समृद्ध व्हावे, या उद्देशाने वाढदिवसानिमित्त शाळेला पुस्तक भेट हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी आपला वाढदिवस साजरा करताना शाळेला एक पुस्तक भेट देण्याचा संकल्प केला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीनुसार कथा, कादंबरी, विज्ञान, सामान्य ज्ञान, चरित्र, प्रेरणादायी पुस्तके इत्यादी ग्रंथ शाळेला भेट देण्याचा संकल्प केला. दिलेली पुस्तके शाळेच्या ग्रंथालयात नोंद करून सर्व विद्यार्थ्यांसाठी वाचनासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय वाढेल, ज्ञानात भर पडेल आणि वाढदिवस साजरा करण्याची एक सकारात्मक व प्रेरणादायी पद्धत निर्माण होईल. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड वाढते. शाळेचे ग्रंथालय समृद्ध होते. वाढदिवस साजरा करण्याची चांगली व अर्थपूर्ण पद्धत निर्माण होते. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानवृद्धी होते. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची गोडी वाढवणारा आणि शाळेसाठी उपयुक्त ठरणारा आहे.

# भोळे महाविद्यालयाच्या बॉक्सिंग खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड

**भुसावळ ।** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, आंतर विभागीय बॉक्सिंग पुरुष स्पर्धा एसपीडीएम महाविद्यालय शिरपूर धुळे येथे झाल्या. या स्पर्धेत देविदास नामदेव भोळे महाविद्यालयातील बॉक्सिंग खेळाडू ४७-५० किलोग्रॅम गटात सावळे पवन संजय तृतीय वर्ष कला, ६५-७० किलोग्रॅम गटात गुलाम हुसेन खान चांद खान तृतीय वर्ष विज्ञान, ७०-७५ किलोग्रॅम गटात सुरवाडे प्रतीक दिनेश तृतीय वर्ष विज्ञान, ८०-८५ किलोग्रॅम बाहे गौरव गोपाळ यांनी प्रथम क्रमांक पटकावला व जळगाव विभागास जनरल चॅम्पियनशिप मिळवून दिली.


# जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव

८ मार्च

### दि. 8 मार्च 2026 - जागतिक महिला दिन महानगरपालिकेतर्फे आयोजित कार्यक्रम

| वेळ | कार्यक्रम |
| --- | --- |
| स. ११ ते १२ | **सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व मान्यवर पाहुण्यांचे स्वागत.** |
| दु. १२ ते १ | **बचत गटांना कर्जाचे चेक वाटप**<br>१) श्रीकृष्ण महिला बचत गट २) श्री स्वामी समर्थ महिला बचत गट<br>३) नवदुर्गा महिला बचत गट<br>**उत्कृष्ट काम करणाऱ्या जशमनपा महिला कर्मचारी सत्कार**<br>**प्रमुख अतिथी यांच्या हस्ते १० वी, १२ वी व पदवी मध्ये प्रथम ३ येणाऱ्या विद्यार्थीनींचा सत्कार**<br>१०वी - १. सृष्टी विशाल कुलकर्णी २. आर्या सचिन डहाळे<br>३. निकीता हेमराज चव्हाण<br>१२वी - १. सिद्धी शरद कुलकर्णी २. भूमी सतीश भावसार<br>३. अनम अकिल पटेल<br>पदवी - १. मुस्कान राकेश जैन २. महिन फातेमा शेख<br>३. रेणुका शैलेश नेवे |
| दु. १२.३० ते १.३० | **प्रमुख अतिथी/ मान्यवर यांचे उपस्थितांना मार्गदर्शन** |
| दु. १.३० ते २.०० | **महिलांना आरोग्यविषयकव महिलांमध्ये आढळून येणाऱ्या कर्करोग आजाराबद्दल माहिती व त्यानतर मान्यवर डॉक्टरांचे व्याख्यान**<br>१. डॉ. रुचा नवाल (ब्रेस्ट कर्करोग विषयक)<br>२. डॉ. अंजली भिरुड (गर्भाशय कर्करोग विषयक) |
| दु. २.०० ते २.३० | **महिलांसाठी जेवणाची व्यवस्था** |
| दु. २.३० ते ३.३० | **जागतिक महिला दिनानिमित्त उपस्थित महिलांकरीता विविध तीन खेळ**<br>१. संगीत खुर्ची २. तळ्यात-मळ्यात ३. बादलीत बॉल टाकणे ४. एक मिनीट शो |
| दु. ३.३० ते ४.३० | **प्रमुख अतिथींच्या हस्ते जागतिक महिला दिनानिमित्त घेण्यात आलेल्या खेळामध्ये प्रथम पाच आलेल्या महिलांना बक्षिस वाटप** |
| दु. ४ ते ४.३० | **आभार प्रदर्शन व कार्यक्रमाचा समारोप** |



जागतिक महिला दिनानिमित्त जळगाव शहरातील सर्व भगिनींना
**हार्दिक शुभेच्छा !**

***आपल्या थकित घरपट्टी व पाणीपट्टीसाठी शास्ती माफीचा फायदा घ्या, आपला कर आजच भरा.***

### महिलांच्या हितासाठी महानगरपालिकेतर्फे राबविल्या जाणाऱ्या योजना.

- कवयित्री महिणाबाई जळगाव भुषण पुरस्कार
- लेक लाडकी या घरची योजना
- शिष्यवृत्ती योजना
- विधवा/निराधार महिलांच्या कन्या विवाहासाठी अर्थसहाय्य देणे.
- महिला बचत गटाच्या माध्यमातून कापडी पिशव्यांची निर्मिती करून विकत घेणे व नागरिकांना मोफत वितरीत करणे.
- म.न.पा. प्राथमिक शाळेतील व म.न.पा./ बालवाडीतील विद्यार्थी यांना मोफत गणवेश, बुट, मोजे वाटप करणे.
- म.न.पा. प्राथमिक शाळेतील व म.न.पा./ बालवाडीतील विद्यार्थी यांना दप्तर, शैक्षणिक साहित्य, पाण्याची बॉटल, खेळांचे साहित्य व बेंचेस इत्यादी वाटप करणे.
- दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या महिला व बालकांना (HIV ग्रस्त, कॅन्सरग्रस्त, अर्धांगवायू, क्षयरोग इत्यादी सारखे गंभीर आजार) झालेल्यांना NEFT, RTGS द्वारे उदरनिर्वाहाकरीता अर्थसहाय्य करणे.
- मुलींना, महिलांना व महिला बचत गटांना व्यावसायिक रिटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण देणे.
- महिलांकरीता व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम राबविणे. उदा. संभाषण कौशल्य, सभा धिटपणा, सुत्रसंचालन, इव्हेन्ट.
- गुणवंत विद्यार्थीनींचा गुणगौरव करणे.
- महिला व मुलींकरीता विविध स्पर्धांचे आयोजन करणे.
- महिला व मुलींच्या स्वयंरक्षणाचे प्रशिक्षण देणे.
- आधार योजना 65 वर्षावरील ज्येष्ठ महिला, विधवा, निराधार, परितक्त्या महिलांना उदरनिर्वाहासाठी अर्थसहाय्य करणे.
- महिला व बालकांसाठी असणाऱ्या योजनांच्या महितीचा प्रचार करून जनजागृती करणे.
- महिला व बचत गटा निर्मित खाद्य वस्तू विक्रीकरीता महोत्सव आयोजित करणे.
- महिला बचत गटांना व्यवसायाकरीता शिलाई मशिन, कांडप मशिन, शेवया मशिन इत्यादी मशिनसाठी अर्थसहाय्य देणे.
- बचत गटामार्फत उपहारगृह (कॅन्टीन) चालविणे.
- महिला व बचत गटांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थांना कायमस्वरूपी विक्री केंद्र उपलब्ध करून देणे कामी अर्थसहाय्य करणे.
- मुली व महिला ई-दुचाकी, ऑटोरिक्षा (EV) करीता अर्थसहाय्य करणे.
- माझी कन्या माझा अभिमान योजना.
- मुलींसाठी / महिलांसाठी अत्याधुनिक स्वच्छतागृह बांधणे व दुरुस्ती करणे.
- म.न.पा. सार्वजनिक शौचालय, म.न.पा. शाळा, म.न.पा बालवाडी इत्यादी ठिकाणी मुलींच्या / महिलांच्या प्रसाधनगृहामध्ये सॅनिटरी नॅपकिन व्हेंडींग मशिन व सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करून देणे.

----------------------: विनीत :----------------------

| सौ. दीपमाला काळे | श्री. मनोज चौधरी | श्री. चंद्रशेखर पाटील | श्रीमती सिंधूताई कोल्हे | श्री. ज्ञानेश्वर ढेरे |
| --- | --- | --- | --- | --- |
| महापौर | उपमहापौर | समापती, स्थायी समिती | सभापती, महिला व बालकल्याण समिती | आयुक्त |

**सर्व सन्माननीय नगरसेविका व नगरसेवक व अधिकारी वर्ग जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव**

MRUDANG INDIA

# चोपड्यात २ हजार थकबाकीधारकांना नोटीसा

## घरोघरी जाऊन अवैध नळ कनेक्शन कट करण्याचा इशारा ; पुढची आणखी कठोर कारवाई !





प्रतिनिधी । चोपडा

**शहरातील मालमत्ता कर, पाणीपट्टी किंवा अन्य थकबाकीधारकांची घरोघरी जाऊन चोपडा नगरपरिषदेने शोधमोहीम राबवली आहे. आता २ हजार थकबाकीधारकांना नोटीसा बजावल्याने त्यांचे धाबे दणाणले आहे. नोटिसीनंतर थकबाकीधारकांचे नळ कनेक्शन कट करणे यासह विविध कारवाई करण्याचा इशारा चोपडा नगरपरिषद प्रशासनाने दिला आहे.**

चोपडा नगरपरिषदेने थकबाकी वसुलीसाठी धडक मोहीम सुरू केलेली असून आता ही मोहीम आणखी तीव्र करण्यात आली आहे. शहरात घरोघरी जाऊन नोटीस बजावण्याचे अभियान सुरू करण्यात आले आहे. मागील आठवड्यात नगरपरिषद प्रशासनाने थकबाकीदारांविरुद्ध नळ कनेक्शन कट करणे व नगरपरिषदेच्या गाळ्यांना सील लावणे, अशा कठोर कारवाया केल्या होत्या. या कारवाईमुळे शहरात मोठी खळबळ उडाली होती आणि अनेक थकबाकीदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या पार्श्वभूमीवर आता नगरपरिषदेच्या वसुली पथकांकडून शहरातील प्रत्येक मालमत्ताधारक, नळ कनेक्शनधारक तसेच अवैध नळ कनेक्शनधारकांना नोटीस बजावण्याची कारवाई मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. सध्या शहरात सुमारे २००० नोटिसांचे वाटप करण्यात आले असून अजूनही ही प्रक्रिया सुरू आहे. वसुली पथके विविध प्रभागांमध्ये जाऊन नागरिकांना प्रत्यक्ष भेट देऊन नोटीस देत आहेत.

**नोटीसनंतर थेट कारवाई**

नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, नोटीस मिळाल्यानंतर ठरावीक मुदतीत मालमत्ता कर, पाणीपट्टी किंवा अन्य थकबाकी भरली नाही तर संबंधितांविरुद्ध थेट कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. यात नळ कनेक्शन तात्काळ बंद करणे, अवैध नळ कनेक्शन जप्त करणे, मालमत्तेवर बोजा बसविणे, जप्तीची कारवाई, गाळे, दुकानांना सील करणे, कायदेशीर कारवाई, अशा विविध उपाययोजना करण्यात येणार आहेत.

**अवैध नळ कनेक्शनधारकांसाठी अंतिम इशारा**

शहरात अनेक ठिकाणी अवैध नळ कनेक्शन असल्याचे नगरपरिषदेच्या निदर्शनास आले आहे.

अशा कनेक्शनधारकांनी तात्काळ नगरपरिषद कार्यालयाशी संपर्क साधून आपले नळ कनेक्शन वैध करून घ्यावे, अन्यथा अचानक तपासणी करून कनेक्शन तोडण्याची कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे.

### ● आज नोटीस, उद्या कारवाई !

नगरपरिषद प्रशासनाच्या या मोहिमेमुळे शहरातील थकबाकीदारांमध्ये पुन्हा एकदा धास्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील आठवड्यातील सील व नळ कनेक्शन कट कारवाईनंतर अनेक नागरिकांनी स्वतः नगरपरिषदेत येऊन थकबाकी भरण्यास सुरुवात केली आहे. नगरपरिषदेकडून स्पष्ट करण्यात आले आहे की, नोटीस वाटप पूर्ण झाल्यानंतर पुढील टप्प्यात मोठ्या प्रमाणावर थेट कारवाईचे सत्र सुरू होणार आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी तातडीने थकबाकी भरून तसेच अवैध नळ कनेक्शन वैध करून घेऊन कारवाई टाळावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चोपडा फार्मसी महाविद्यालयाचे प्रा.डॉ. मोहम्मद रागीब यांना सिंगापूर विद्यापीठातून डॉक्टरेट पदवी

प्रतिनिधी । चोपडा

**महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित श्रीमती शरदचंद्रिका सुरेश पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, चोपडा येथील प्रा. डॉ. मोहम्मद रागीब मोहम्मद उस्मान यांनी नानयांग टेक्नोलॉजिकल युनिव्हर्सिटी, सिंगापूर येथून २०२५-२६ सत्रात पोस्ट- डॉक्टरेट ही प्रतिष्ठित पदवी यशस्वीरीत्या संपादन केली आहे. ही पदवी संबंधित युनिव्हर्सिटी तसेच युनिव्हर्सिटी ग्रांट्स कमिशन, नवी दिल्ली यांच्याकडून मान्यताप्राप्त असून ही कामगिरी त्यांच्या परिश्रम, संशोधननिष्ठा आणि शैक्षणिक समर्पणाचे द्योतक आहे.**

डॉ. रागीब हे मागील १८ वर्षांपासून फार्मसी विभागाचे विभागप्रमुख व एनएएसी समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. संशोधन विभागात त्यांचे मोलाचे योगदान असून त्यांच्या नावावर २७ पेटंट्स, १८० हून अधिक पुस्तक, १९० संशोधन पेपर्स आणि १८५ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सादरीकरणे नोंदलेली आहेत. तसेच ते बी. फार्मसी, एम. फार्मसी आणि पी एच.डी. विद्यार्थ्यांचे कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ मान्यताप्राप्त गाईड असून पीसीआय इन्स्पेक्टर म्हणून देखील कार्यरत आहेत.

त्यासोबतच डॉ. मोहम्मद रागीब हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या बोर्ड ऑफ स्टडीज व बोर्ड ऑफ एक्झामिनेशनचे मान्यवर सदस्य आहेत. त्यांना ३८ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अवॉर्ड्स प्राप्त झाले असून त्यांचे नाव हूज हू या आंतरराष्ट्रीय संदर्भग्रंथात समाविष्ट आहे. डॉ. मोहम्मद रागीब हे सर्व विद्यार्थी व शिक्षकांसाठी प्रेरणादायी उदाहरण असून त्यांच्याकडून खूप काही शिकण्यासारखे आहे.

या उत्तुंग यशानिमित्त महाविद्यालयात त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड. संदीप पाटील, महात्मा गांधी मंडळाच्या सचिव स्मिता संदीप पाटील, प्राचार्य डॉ. गौतम वडनेरे, रजिस्टर प्रफुल्ल मोरे, सर्व डिपार्टमेंटचे विभाग प्रमुख उपस्थित होते. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सहकारी यांनी डॉ. मोहम्मद रागीब यांचे कौतुक केले.



## थोडक्यात

### डॉ. आचार्य विदयालयात प्रश्नमंजूषा स्पर्धा

**जळगाव ।** डॉ. अविनाश आचार्य विद्यालय प्राथमिक विभागात इ. चौथीच्या विद्यार्थ्यांची परिसर विषयावर आधारित प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आली. यात भूगोल, नागरिकशास्त्र, परिसर दोन, विज्ञान या विषयावरील विविध प्रश्न विद्यार्थ्यांना विचारण्यात आले. मुख्याध्यापिका डॉ. रत्नमाला पाटील, छोटू पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मेडल व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. प्रथम क्रमांक गिरणा गट, द्वितीय तापी गट तर तृतीय क्रमांक बोरी व पूर्णा गटाने मिळवला. सूत्रसंचालन प्रमोद इसे यांनी केले. योगेश जोशी, सुनील वाघ, कविता पाटील, वंदना सावदेकर यांनी नियोजन केले.

# जिल्ह्यातील २६ गावांचा दूषित पाणीपुरवठा ऐरणीवर

## विधान परिषदेत प्रशासनाला धरले धारेवर ; आ. खडसे आक्रमक

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जनतेच्या आरोग्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. जिल्ह्यातील ६ तालुक्यांमधील २६ गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत दूषित झाल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचा गंभीर मुद्दा आ.एकनाथराव खडसे यांनी विधान परिषदेत तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित केला. दूषित पाण्यामुळे टायफॉइड, कॉलरा आणि हिपॅटायटीस-ए सारख्या आजारांचा धोका वाढला असून, प्रशासकीय यंत्रणेने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आ.खडसे यांनी यावेळी केला.**



आ. खडसे यांनी सभागृहात माहिती देताना सांगितले की, आरोग्य विभागाने ५ डिसेंबर २०२५ रोजी केलेल्या सर्वेक्षणात ही बाब समोर आली होती. तरीही प्रशासनाकडून ठोस उपाययोजना करण्यास विलंब का झाला? नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असताना शासन नेमकी काय कारवाई करत आहे आणि संबंधित गावांमध्ये जलशुद्धीकरणासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत, असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.आ.खडसे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी माहिती दिली की, नोव्हेंबर २०२५ मध्ये जळगाव जिल्ह्यात एकूण २,३६६ पाणी नमुन्यांची तपासणी करण्यात आली होती. यामध्ये ३४ नमुने दूषित आढळले होते, ज्यात ३१ नमुने ग्रामीण भागातील तर ३ शहरी भागातील होते. प्रकल्प संचालक यांच्या अहवालानुसार, या ३४ नमुन्यांची तातडीने पुनर्तपासणी करण्यात आली असून आता ते पाणी पिण्यायोग्य असल्याचे अहवालात म्हटले आहे.

ज्या स्त्रोतांचे पाणी दूषित आढळले होते, तिथे सलग तीन दिवस सुपरक्लोरिनेशन प्रक्रिया राबवून जलशुद्धीकरण करण्यात आले आहे.

● सध्या या गावांमध्ये मेट्रॉपिकल क्लोरिनेटेड लाईम (टी.सी.एल.) चा वापर करून दैनंदिन पाणी शुद्धीकरण केले जात आहे. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार, सद्यस्थितीत जलजन्य आजारांच्या रुग्णांमध्ये वाढ दिसून येत नसल्याचेही मंत्र्यांनी स्पष्ट केले. ग्रामीण भागातील जनतेला शुद्ध आणि सुरक्षित पाणी मिळावे, यासाठी एकनाथराव खडसे यांनी घेतलेल्या या आक्रमक भूमिकेचे जळगाव जिल्ह्यातून स्वागत होत आहे.

# महिला, मुलींनी देश प्रेम अन् समाजहितासाठी कार्य करावे

प्रतिनिधी । जळगाव

**आपल्या देशातील प्रत्येक नागरिकांच्या रक्तामध्ये जन्मतःच देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा आणि समाजसेवा या गोष्टी अंतर्भूत आहेत. त्यामुळे महिला, मुलींनी आणि युवकांनी देशप्रेम, राष्ट्र व समाज हितासाठी कार्य करावे. यासाठी भारतीय लष्करात सेवा देण्यासाठी पुढे यावे,असे आवाहन भारतीय सैन्य दलातील सेवा निवृत्त मेजर मैत्रेयी दांडेकर यांनी केले.**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील समाजशास्त्र विभाग व स्त्री अभ्यास केंद्र यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त दि. ७ मार्च रोजी सामाजिक शास्त्रे प्रशाळेच्या सभागृहात फॅशन टू ॲक्शन: भारतीय सैन्यात भरती होण्याचा प्रवास, या विषयावर भारतीय सैन्य दलातील सेवा निवृत्त मेजर मैत्रेयी दांडेकर यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. अजय पाटील हे होते. या कार्यक्रमास व्यसवास्थापन परिषद सदस्य प्रा. पवित्रा पाटील, डॉ. कांचन महाजन, प्रा. जयदीप साळी, डॉ. उमेश गोगडीया, डॉ. तुषार रायसिंग कार्यक्रम समन्वयक डॉ. प्रशांत सोनवणे यांची उपस्थिती

# आकाश त्रिवेदी आयएएस यादीत ७३ वा; एरंडोलच्या सुपुत्राची गगनभरारी

प्रतिनिधी । एरंडोल



**ॲड. ओम त्रिवेदी व रेखा त्रिवेदी यांचा थोरला पुत्र आकाश त्रिवेदी (वय २३) याने देशातील प्रतिष्ठित नागरी सेवा (युपीएससी) परीक्षेत देशपातळीवर ७३ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.**

आकाशने आयआयटी कानपूर येथून कॉम्प्युटर सायन्स शाखेत बी.टेक पदवी प्राप्त केली आहे. त्याची निवड देशातील अग्रगण्य व्यवस्थापन संस्था अहमदाबाद येथेही झाली होती. अत्यंत कमी वयात युपीएससी परीक्षा उत्तीर्ण होत त्याने आपल्या जिद्द, परिश्रम आणि अभ्यासू वृत्तीचे दर्शन घडविले आहे. आकाश आणि त्याचा लहान भाऊ अभय यांच्या शैक्षणिक प्रवासात पालक म्हणून ॲड. ओम त्रिवेदी व रेखा त्रिवेदी यांनी नेहमीच मित्रवत भूमिका घेतली. मुलांना उत्तम शिक्षण, व्यापक वाचनाची सवय आणि सामान्य ज्ञान वाढविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रेरित केले.

# कलागुण कौशल्य कार्यशाळेतून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना मिळतो वाव : प्रा. डॉ. संदिप नेरकर

प्रतिनिधी । चोपडा

**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठ नेहमी प्रयत्नशील असते. त्याचाच एक भाग म्हणून कला गुण कौशल्य सारख्या कार्यशाळेच्या आयोजनातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो, असे प्रतिपादन प्रा. डॉ. संदिप नेरकर यांनी केले.**



महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५ ते ७ मार्चदरम्यान तीन दिवसीय विद्यापीठस्तरीय कला गुण कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन स्मार्ट हॉल येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावचे अधिसभा सदस्य प्रा. डॉ. संदिप नेरकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. संदीप पाटील, सचिव डॉ. स्मिता पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच विद्यार्थी विकास संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी, जळगाव जिल्हा समन्वयक डॉ. संजय पाटील यांनी सहकार्य यांचे सहकार्य लाभले. या शिबिराच्या उदघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे हे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक वन संरक्षक महेंद्र पाटील हे उपस्थित होते. याप्रसंगी कार्यशाळा निरीक्षक डॉ. स्वप्निल खरे, डॉ.अजय पाटील, महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.आर.एम. बागुल, उपप्राचार्य प्रा.डॉ.ए.बी.सूर्यवंशी, महाविद्यालयाचे समन्वयक डॉ.एस.ए.वाघ, प्र.रजिस्ट्रार डी.एम.पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.डी.डी.कर्दपवार व इतर मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ.डी.डी. कर्दपवार यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्रा.डॉ. के.एन.सोनवणे यांनी नाट्य, संगीत व नृत्याचे महत्व समजावून सांगितले.

या कार्यशाळेचे सूत्रसंचालन एस. बी. पाटील यांनी केले. आभार डॉ. पी. एम. रावतोळे यांनी मानले. याप्रसंगी विद्यापीठातील विविध महाविद्यालयाचे बहुसंख्य विद्यार्थी, प्रतिनिधी उपस्थित होते.

# भुसावळकरांची पाणीटंचाईतून सुटका

## हतनूरच्या आवर्तनाने बंधारा ओव्हर फ्लो; पाण्याचा जपून वापर करा

प्रतिनिधी । भुसावळ

**ऐन उन्हाळ्यात भुसावळकरांना पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची भीती होती. मात्र, आता हतनूर धरणातून सोडण्यात आलेले आवर्तन तापीच्या बंधाऱ्यात पोहोचल्याने किमान ४० दिवस तरी शहरवासीयांना टंचाईच्या झळा जाणवणार नाहीत. असे असलेतरी नागरिकांनी पाण्याचा जपून व काटकसरीने वापर करावा, असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे.**

**पालिकेचा बंधारा ओव्हर फ्लो**

हतनूर धरणातून भुसावळ शहरासह रेल्वे व दीपनगर औष्णिक केंद्रासाठी सोमवार, २ मार्चला दुसरे आवर्तन सोडण्यात आले व आवर्तनाचे पाणी शुक्रवारी पालिकेच्या बंधाऱ्यात येताच बंधारा ओव्हर फ्लो वाहू लागला. त्यामुळे तूर्ततरी पाण्याची टंचाई मिटली आहे. आगामी तीन दिवसांत पाणीपुरवठ्याचे रोटेशन आता सुरळीत होणार आहे.



### ➤ तूर्त चिंता मिटली

भुसावळ शहराला तापीनदी पात्रातील बंधाऱ्यातून पाणीपुरवठा होतो. मात्र, बंधाऱ्यात केवळ ३८ ते ४० दिवसांचा पाणीसाठा करता येतो. गेल्या पंधरवड्यात बंधाऱ्याची जलपातळी घसरल्याने शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. त्यानंतर रेल्वे प्रशासन तसेच पालिकेने हतनूर प्रशासनाकडे आवर्तनाची मागणी केली. त्यानंतर हतनूर धरणातून १२ दलघमीचे आवर्तन हजार क्यूसेस वेगाने सोडण्यात आले. हे पाणी शुक्रवारी बंधाऱ्यात पोहोचले असून शहरवासीयांची पाण्याची चिंता तूर्त तरी मिटली आहे.

# श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे तिथीनुसार शिवजयंती साजरी



प्रतिनिधी । चोपडा

**श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान आयोजित तिथीनुसार छत्रपती श्री शिवाजी महाराज जयंती निमित्त चोपडा शहरातील शिवतीर्थावर पारंपरिक पद्धतीची साज सजावट करण्यात आली होती. त्यात रोषणाई बरोबरच केळीच्या पिलांनी स्मारक सजवलेले होते.**

जयंतीनिमित्त सकाळी आठ वाजता शिवरायांचा दुधाभिषेक, जलाभिषेक करून, प्रेरणा मंत्र, ध्येय मंत्र घेऊन, खडीसाखरचा प्रसाद वाटून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी शहरातील माजी नगररसेवक अनिल वानखेडे, नगरसेवक गजेंद्र जैस्वाल, नरेंद्र पाटील, डॉ. रोहन पाटील, शरद पाटील, नरेश महाजन यांचेसह धारकऱ्यांबरोबरच हिंदु अभिमानी देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.